Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारतीय समाजात संगीत वाद्यांचे स्थान

प्रा. ज्ञानेश्वर बोंपिलवार
श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालय खामगांव

**प्रस्तावना :**

''गायन, वादन व नृत्य या तीनही कलांच्या समूहाला संगीत असे म्हणतात." अशी सर्वसामान्य संगीताची व्याख्या केली जाते.संगीत कलेअंतर्गत गायन, वादन व नृत्य या तीनही कलांना समान महत्व दिसून येते. भारतीय समाजात गायन व नृत्याबरोबरच वादनाला अनन्यसाधारण असे महत्व आहे.बाळाच्या जन्मानंतर वाद्यांचा संबंध प्रस्थापित होतो. बाळाचा नामकरण संस्कार होतो त्यावेळी अनेकजण विविध खेळणी व दागदागिणे भेटवस्तूच्या स्वरुपात दिल्या जातात.त्यामधून वाद्याचा संबंध बाळासोबत प्रस्थापित होतो.वेगवेगळया खेळण्यांमधून बाळाचे लक्ष वेधण्यासाठी वाद्यांचा सुध्दा उपयोग होतो.

संगीत ध्वनी निर्माण करण्याचे साधन म्हणजे वाद्य होय.वाद्याची निर्मिती मानवी संस्कृती इतकीच प्राचीन आहे. एका दृष्टीने मानवी शरीरच प्राचीन वाद्य आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. भारतीय विद्वान याला 'दैवीविणा' तर मानवाने तयार केलेल्या वाद्यांना 'मानुषी' म्हणतात.गायनांच्या लय व स्वर या अंगाच्या उत्क्रांतीबरोबरच वाद्यांची उत्क्रांती झाली असावी. त्यामध्येसुध्दा सर्वात अगोदर लयीची जाणीव झाली असावी. पळतांना किंवा चालतांना होणारा लयीतला फरक तसेच मानवी प्रतिक्रीया व्यक्त करण्यासाठी केलेल्या शारिरिक हालचाली उदा.हाताने टाळया वाजविणे, पाय आपटणे यातून लय वाद्याची कल्पना आली असावी. विभिन्न पशू, पक्षांचे आवाज यातून स्वरवाद्याची कल्पना तर जमीनीतील खडडयावर कातडी टाकून त्यातून आवाज निघाला असता अवनध्द वाद्याची निर्मिती झाली असावी. जंगलातील झाडांमधून येणाऱ्या हवेच्या आवाजातून सुशीर वाद्य तर धनुष्याच्या ताणलेल्या बाणातून तंतूवाद्याची निर्मिती झाली असावी असे मानले जाते.

संगितिक वाद्ये ही वैदीक काळापासून भारतीय समाजाचे प्रमुख अंग बनले. त्याकाळी धार्मिक विधी, यज्ञ, करत असतांना वीणा, बासरी, मृदंग ही वाद्ये वापरली जात असत. कालांतराने विविध मंदिरे, युध्द भूमी, रंगमंचाबरोबरच सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात वाद्ये वापरास सुरुवात झाली. वात्सायनाच्या काळात तर उत्तम नागरिक होण्यासाठी संगीत वाद्य शिक्षण अत्यावश्यक मानले जाऊ लागले. आर्य, चाणक्याने तर आपल्या गुप्तचरांना शत्रुच्या आक्रमणाची चाहूल देण्यासाठी शंखनादाचा वापर केला. हिंदू देवीदेवतांची वाद्याशिवाय महती सांगणे कठीणच आहे. जसे डमरुशिवाय शंकर, बासरीशिवाय कृष्ण, वीणेशिवाय सरस्वती आणि शंखाशिवाय विष्णू यांची कल्पनाच आपण करु शकत नाही. एकूणच काय तर प्राचीन काळापासून संगीत कलेत विविध वाद्यांनी भारतीय समाजात नवचैतन्य निर्माण केले.

मुसलमानी राजवटीत भारतीय संगीत वाद्यांची अवस्था अंधकारमय झाली होती. भारतीय संस्कृती नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न असल्यामुळे त्याचा परिणाम वाद्यावरसुध्दा काही प्रमाणात झाला.हीच अवस्था इंग्रजांच्या काळातसुध्दा कायम होती.स्वातंत्र्य प्राप्तीच्या आधी भारतीय समाजात मंगल कार्य सणवार, उत्सव, धार्मिक स्थळी संगीत मैफिलीचे आयोजन नेहमीच केले जात असे. परंतु गीत गाणे किंवा वादय वाजविणे कमी प्रतिष्ठेचे मानले जात होते व त्यामुळे वादय वादकांची संख्या मर्यादित राहीली. शुभमंगल प्रसंगी अथवा विविध उत्सव प्रसंगी शहनाई, नागस्वरम, शंख, मृदंग, घंटा यासारखे वाद्ये वाजविली जायची.याबरोबरच सतार, तबला, बासरी या वाद्यांचासुध्दा मर्यादीतच वापर होता. भारतीय स्वातंत्र्यानंतर

कलेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला व कलेला मानसन्मान मिळू लागला. मुस्लिम ग्रंथ, कुराणामध्ये वाद्याबददल व संगीताबददल काही प्रमाणात उदासीनता दिसून येत असली तरी मुस्लिम लोकांच्या विविध समारंभात गायन, वादनाचा आस्वाद घेतला जातो. प्रख्यात गायक उस्ताद बडे गुलामअलीखॉं, उस्ताद अमीरखॉं, प्रसिध्द तबला वादक अहमदजान थिरकवा, उस्ताद अल्लारखॉं, प्रसिध्द शहनाई वादक बिस्मिल्लाखॉं, प्रसिध्द तबला वादक उस्ताद झाकिर हुसेन यांना रसिक कधीही विसरु शकत नाही.

भारतीय समाजाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, वाद्याशिवाय कोणताही कार्यक्रम पार पाडणे शक्य नाही.होळीच्या कार्यक्रमाच्या वेळी वृंदावनात, बैसाखीला पंजाबात, दुर्गापूजेला बंगालमध्ये आणि गणपती उत्सवात महाराष्ट्रात विविध वाद्ये मोठया प्रमाणात वाजविली जातात. घरगुती कार्यक्रमात विविध स्त्रियासुध्दा ढोलक वाजवून गाणे गात असतात. मंगल प्रसंगी वाजणारी वाद्ये ही कानाला कर्णमधुर वाटतात तर युध्दभूमीवरील वाद्ये गंभीर स्वरुपाचा आवाज असणारी असतात. शुभप्रसंगी केले जाणारे वादन हे आनंदमयी असते. त्यामुळे वातावरणसुध्दा उत्साही होते. याप्रसंगी शंख, घंटा, शहनाई, चौघडा, बासरी, बॅंड इ. वाद्ये वाजविले जातात.

**निष्कर्ष :**

अशा प्रकारे मानवाच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत वाद्यांचा घनिष्ठ संबंध येतो. मानवाचे दुःख असो वा आनंद असो कोणत्याही प्रसंगी वाद्ये ही महत्वाची भुमिका पार पाडत असतात.वाद्यामध्ये अशी जादु आहे की, माणूस वाद्ये वाजवितांना दुःख विसरुन त्यामध्ये रममाण होतो. त्याचप्रमाणे आनंदाच्या प्रसंगी भजन, किर्तन, वाढदिवस, लग्न, मुंज या कार्यक्रमांमध्ये सांगितिक वाद्यांचा मोठया प्रमाणात उपयोग होतो.सामाजिक एकोपा निर्माण करण्यासाठी आर्केस्ट्रा, संगीत मैफिली इत्यादीचे आयोजन केले जाते. त्यामध्ये वाद्ये ही मोलाची ठरतात. सध्याच्या युगात एकल वादन (Solo) मोठया प्रमाणात करतांना कलावंत दिसून येतात. विविध मैफिलीतून तबला, सतार, संतूर, जलतरंग, पखवाज, व्हायोलिन, बासरी इत्यादी वाद्यांचे स्वतंत्र कार्यक्रम होतांना दिसून येतात.

**संदर्भ :**

१. निबंध संगीत - लक्ष्मीनारायण गर्ग
२. भारतीय संगीत वादय - डॉ. लालमणी मिश्र
३. प्राचीन भारतातील संगीत - डॉ. धर्मावती श्रीवास्तव